# जलस्वराज्य-२ कार्यक्रम, जिल्हा परिषद औरंगाबाद

**प्रशिक्षणाचे नाव** - जट समन्वयक, समूह समन्वयक, पंचायत समिती स्तरावरील विस्तार अधिकारी (पं.), ग्रामसेवक यांच्यासाठी जिल्हास्तर दोन दिवशीय प्रशिजज ज ार्यज्र म.

**प्रशिक्षण उद्देश** - जलस्वराज्य-२ कार्यकम अंतर्गत प्राधान्याने निवडण्यात आलेल्या निमशहरी गावे जलधर निर्धारण लोकसहभागा आधारित भुजल व्यवस्थापन या कार्यक्रमातर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये राबविण्याच्या उपक्रमांबाबत जाणीवजागृती व्हावी आणि कार्यक्रमा अंमलबजावणीमध्ये ग्रामपंचायत मधील ग्रामसेवक आणि विस्तार अधिकारी (पं.) यांचा सहभाग वाढावा.व जलस्वराज्य २ या कार्यक्रमाची ओळख व्हावी .

**प्रशिक्षणाची तारीख** - २२ ते २३ मार्च २०१७

**प्रशिजज स्थळ** - हॉटेल मनमंदिर, औरंगाबाद

**सहभाजी प्रशिजजार्थी** - जट समन्वयक,समूह समन्वयक,पंचायत समिती स्तरावरील विस्तार अधिकारी (पं.), ज्रामसेवज .

**संक्षिप्त अहवाल** - जलस्वराज्य -२ कार्यक्रमांतर्गत विविध उपांगाची अंमलबजावणी व प्रकल्प चक्रे याविषयी प्रशिक्षणार्थींना अवगत करुन त्याविषयी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्यक्रम समन्वयक यांनी प्रकल्प चक्र समजून सांगत असतांना वेगवेगळया घटकांतर्गत वेगवेगळे प्रकल्प चक्र कसे आहे यामधील फरक समजावून सांगून पूर्व नियोजन, नियोजन, अंमलबजावणी, देखभाल दुरुस्ती, या विषयी सखोल मार्गदर्शन केले. पाणी व स्वच्छता कार्यक्रमांमध्ये समाज व्यवस्थापनाचे महत्व, तत्वे व विविध पध्दती यावर समाज व्यवस्थापन तज्ञ जलस्वराज्य-२ कार्यक्रम यांनी सखोल असे मार्गदर्शन केले. यामध्ये जलस्वराजय-२ ज ार्यज्र म राबवित असतांना व जागतिक बॅंकेचे निकष पाहता समाजव्यवस्थापनाला कार्यक्रमामध्ये किती अनन्यसाधारण महत्व आहे हे यामधून स्पष्ट करण्यात आले.

ज्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छतेमध्ये ग्रापंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, ग्राम पंचायत स्तरीय समित्या व सहाय्यकारी संस्था यांची कर्तव्य व जबाबदा-या यावर सहाय्यकारी संस्थेचे कार्यक्रम समन्वयक व समाज व्यवस्थापन तज्ञ यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर संध्याकाळी ५.४० वा. प्रशिक्षणार्थींची ४ गट तयार करण्यात आले. व त्यांना वेगवेगळे विषय देण्यात आले व पहिल्या दिवसाची संगता करण्यात आली.

## दुसरा दिवस -

सकाळी १०.०० वाजता दुस-या दिवसाच्या प्रशिक्षणास सुरुवात करण्यात आली. त्यामध्ये समाज शास्त्रज्ञ यांनी पहिला दिवशी झालेल्या प्रशिक्षणाचा आढावा घेतला व आजच्या दिवसाच्या कार्यक्रमाविषयी सर्वांना अवगत केले. नंतरच्या सत्रामध्ये अभियात्रिकी तज्ञ जलस्वराज्य-२ कार्यक्रम यांनी गावकृती आराखडा तयार करण्याची पध्दती व त्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश करता येवू शकतो व परिपूर्ण गाव कृती आराखडा कशा असावा, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. माहिती शिक्षण व संवाद जनजागृती व लोकसहभागाच्या पध्दती या विषयावर माहिती शिक्षण संवाद तज्ञ (SBM) यांनी सजोल मार्जदर्श-न ज़ेले व लोकसहभाग मिळविण्याच्या विविध पध्दती विस्तृतपणे प्रशिक्षणार्थीसमोर मांडल्या.

दुपारच्या सत्रामध्ये भोजनानंतर काल दिलेल्या विषयावर गट चर्चा घेण्यात आली व त्यानंतर प्रत्येक गट प्रमुखाने आपल्या गटामध्ये चर्चा करुन दिलेल्या विषयाच्या अनुषंगाने आपल्या गटाचे मत विस्तृतपणे त्याचे समोर लिहुन सादरीकरण केले. अशा प्रकारे सं.५.५० वाजता क्षमता बांधणी तज्ञ (SBM) यांनी सर्व प्रशिक्षणार्थींचे आभार मानले. व प्रशिक्षणाची सांगता करण्यात आली.



**दिप प्रज्वलन करुन कार्यशाळेचे उद्घाटन करतांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री. परमेश्वर राउत**



जलस्वराज्य-२ कार्यक्रमातंर्गत घेण्यात आलेल्या निवासी दोन दिवशीय प्रशिजज ज ार्यक्र मामध्ये प्रास्ताविकपर मार्गदर्शन करतांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. परमेश्वर राउत




२२ मार्च २०१७ रोजी जलदिन निमित्त प्रशिक्षणार्थींना शपथ देतांना श्री. एस.पी. औरंगाबादकर व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.) श्री.परमेश्वर राउत



**माहिती शिक्षण संवाद जनजागती व लोकसहभागाच्या पध्दती यावर मार्गदर्शन करतांना डॉ. श्री. संजय वाघ**



**जट चर्चेसाठी दिलेल्या विषयावर तयार करण्यात आलेला अहवाल सादरीकरण करतांना समूह सम-वयज श्रीमती तीनगोटे**



जट चर्चेसाठी दिलेल्या विषयावर तयार करण्यात आलेला अहवाल सादरीकरण करतांना ग्रामसेविका श्रीमती सावंत



प्रशिक्षणार्थींचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करतांना क्षमता बांधणी तज्ञ श्री. राजु सोनवणे.